आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

४ जून २०२४ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- लोकसभा निवडणुकीच्या निकालांमधे राज्यात महा विकास आघाडी आणि महायुतीत चुरस / महाविकास आघाडीचे उमेदवार २८ तर महायुतीचे उमेदवार १९ मतदारसंघात आघाडीवर
- देशातल्या ५४३ मतदारसंघात भाजपा २३८ जागांवर पुढे तर काँग्रेस ९७ मतदारसंघात पुढे
- ३ मतदारसंघात भाजपा उमेदवार तर एका मतदारसंघात काँग्रेस उमेदवार विजयी
- शेअर बाजाराने अनुभवली कोरोनाकाळानंतरची सर्वात मोठी घसरण

  **आणि**

- सिंगापूर खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत दिग्गज भारतीय खेळाडू आज आपापले सामने खेळणार

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीत राज्यातल्या ४८ मतदारसंघांपैकी भाजपाने आणि काँग्रेसनं प्रत्येकी १२ जागांवर आघाडी घेतली आहे. शिवसेनेला ५ तर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने ११ जागांवर आघाडी घेतली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला ६ तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला एका जागेवर आघाडी मिळाली आहे. एके ठिकाणी अपक्ष उमेदवार आघाडीवर आहे.

केंद्रीय मंत्री पीयुष गोयल आघाडीवर असून केंद्रीय राज्य मंत्री रावसाहेब दानवे आणि भारती पवार आपापल्या प्रतिस्पर्ध्यापेक्षा मागे पडले आहेत.

संपूर्ण राज्याचं लक्ष लागलेल्या बारामती मतदार संघात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या सुप्रिया सुळे १४ हजार मतांनी आघाडीवर आहेत, तर सांगलीमध्ये अपक्ष उमेदवार विशाल पाटील ३ हजार ८३३ मतांनी आघाडीवर आहेत. नागपूर मतदारसंघात भाजपाचे नितीन गडकरी, रत्नागिरी सिंधुदुर्गमध्ये भाजपाचे नारायण राणे, बीडमध्ये भाजपच्या पंकजा मुंडे आघाडीवर आहेत. चंद्रपूरमध्ये भाजपचे सुधीर मुनगंटीवार पिछाडीवर असून तिथे काँग्रेसच्या प्रतिभा धानोरकर यांनी ५७ हजार ६६० मतांनी आघाडीवर आहेत. कल्याणमध्ये शिवसेनेचे श्रीकांत शिंदे तर ठाण्यात शिवसेनेचे नरेश म्हस्के आघाडीवर आहेत. रायगडमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सुनील तटकरे यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या अनंत गीते यांच्यावर २९ हजार १३२ मतांची आघाडी घेतली आहे. अहमदनगरमध्ये भाजपाचे सुजय विखे पाटील यांनी त्यांचे प्रतिस्पर्धी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे निलेश लंके यांच्यावर २ हजार ४५७ मतांची आघाडी घेतली आहे. राज्यातल्या काही मतदारसंघात उमेदवारांनी जवळ जवळ एक लाख किंवा त्याहून अधिक मतांनी आघाडी घेतली आहे. कल्याणमध्ये श्रीकांत शिंदे यांनी त्यांच्या निकटच्या प्रतिस्पर्धी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वैशाली दरेकर यांच्या लढतीविषयी अधिक माहिती देत आहे आमचे वार्ताहर.

**व्हाईस कास्ट -- (नवी मुंबई पीटीसी).... २६ सेकंद**

नंदुरबारमध्ये काँग्रेसचे गोवाल पडवी यांनी भाजपाच्या विद्यमान खासदार हीना गावीत यांच्यावर मोठी आघाडी घेतली आहे. नंदुरबारमधल्या एकंदर परिस्थितीबाबत अधिक माहिती देत आहेत, आमचे वार्ताहर ......

**व्हाईस कास्ट -- (नंदूरबार पीटीसी)....२४ सेकंद**

**नाशिक** मतदारसंघात तेराव्या फेरीअखेर महाविकास आघाडीचे राजाभाऊ वाजे शिवसेनेच्या हेमंत गोडसे यांच्यापेक्षा १ लाख १८ हजार १५९ मतांनी आघाडीवर आहेत.

**बुलढाणा** मतदारसंघात अठराव्या फेरीअखेर शिवसेनेचे उमेदवार प्रतापराव जाधव महाविकास आघाडीचे नरेंद्र खेडेकर यांच्यापेक्षा २४ हजार २६० मतांनी आघाडीवर आहेत.

**रत्नागिरी-सिंधुदुर्ग** मतदारसंघात एकोणिसाव्या फेरीअखेर भाजपाचे उमेदवार नारायण राणे आघाडीवर आहेत. नारायण राणे यांना ३ लाख ६९ हजार ९४९ तर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे विनायक राऊत यांना ३ लाख २१ हजार ३०९ मतं मिळाली आहेत.

**नंदुरबार** लोकसभा मतदारसंघात अठराव्या फेरीअखेर काँग्रेसचे उमेदवार गोवाल पाडवी यांना त्यांच्या निकटच्या प्रतिस्पर्धी भाजपच्या उमेदवार डॉ हीना गावित यांच्यापेक्षा १ लाख १५ हजार ६२८ मतांनी आघाडी मिळाली आहे.

**पालघर** मतदारसंघात भाजपाचे उमेदवार हेमंत सवरा आघाडीवर आहेत. पंधराव्या फेरीअखेर त्यांना ३ लाख ९३ हजार ४७२ मतं मिळाली असून त्यांच्या निकटच्या प्रतिस्पर्धी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या भारती कामडी यांना २ लाख ७३ हजार २७३ मतं मिळाली आहेत.

**जालना** मतदार संघात महाविकास आघाडीचे कल्याण काळे त्यांचे प्रतिस्पस्पर्धी भाजपाचे रावसाहेब दानवे यांच्यापेक्षा ११ हजार ३६ मतांनी आघाडीवर आहेत.

**दिंडोरी** मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे भास्कर भगरे त्यांच्या प्रतिस्पर्धी भाजपाच्या भारती पवार यांच्या पेक्षा ६० हजार ८६८ मतांनी आघाडीवर आहेत.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या मतमोजणीच्या सुरवातीच्या कलांनुसार एकूण ५४३ मतदारसंघापैकी २३८ ठिकाणी भाजपा उमेदवार आघाडीवर आहेत. काँग्रेसचे उमेदवार ९७ मतदारसंघात आघाडीवर आहेत. समाजवादी पार्टी ३५ ठिकाणी आघाडीवर आहे. तेलगु देसम पार्टीचे उमेदवार १६ , तृणमूल काँग्रेसचे उमेदवार ३० मतदारसंघात आघाडीवर आहेत . द्रमुकचे उमेदवार २१ ठिकाणी तर जनता दल उमेदवार १४ जागांवर प्रतिस्पर्ध्यांच्या पुढे आहेत. ६ मतदारसंघांमधे अपक्ष उमेदवारांना आघाडी मिळाली आहे.

**आंध्र प्रदेशात** एकूण २५ मतदारसंघांपैकी तेलगू देसम _१६ वाय एस आर काँग्रेसनं __४_ तर भाजपानं _३_ तर जनसेवा पक्षानं २ जागांवर आघाडी घेतली आहे.

**अरुणाचल प्रदेशात** भाजपनं दोन्ही जागांवर आघाडी घेतली आहे.

**आसाममध्ये** एकूण १४ जागांपैकी भाजपनं __९__ जागांवर तर काँग्रेसनं _३_ जागांवर आघाडी घेतली आहे.

**बिहारमध्ये** एकूण ४० जागांपैकी जनता दल संयुक्त _१४_, भाजप _१३_ , लोक जनशक्ती पार्टी _५_ जागांवर तर राष्ट्रीय जनता दल _३_ जागांवर आघाडीवर आहे.

**छत्तीसगडमध्ये** भाजपनं १० तर काँग्रेसनं एका जागेवर आघाडी घेतली आहे.

**गोव्यात** भाजप आणि काँग्रेस प्रत्येकी एका जागेवर आघाडीवर आहेत

**गुजरातमध्ये** भाजपनं २४ जागांवर आघाडी घेतली असून एका जागेवर विजय मिळवला आहे तर काँग्रेस एका जागेवर आघाडीवर आहे.

तिथल्या मतमोजणीविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधी अर्पणा खुंट यांच्याकडून

**होल्ड- व्हॉईस कास्ट- अपर्णा खुंट**

**हरयाणात** भाजप आणि काँग्रेसची प्रत्येकी ५ जागांवर आघाडी घेतली आहे.

**हिमाचल प्रदेशात** भाजप सर्व ४ जागांवर आघाडीवर आहे.

**झारखंडमध्ये** १४ मतदारसंघांपैकी भाजपनं _८_ जागांवर आघाडी घेतली असून झारखंड मुक्ती मोर्चा _३_ जागांवर तर काँग्रेस _२_ जागांवर आघाडीवर आहे.

**कर्नाटकात** २८ मतदारसंघांपैकी भाजप __१६_ जागांवर, काँग्रेस _१०_ जागांवर आघाडीवर असून जनता दल सेक्युलर _२_जागांवर आघाडीवर आहे.

**केरळमध्ये** २० मतदारसंघांपैकी काँग्रेसनं _१४_ जागांवर तर इंडियन युनियन मुस्लिम लीगनं _२_ जागांवर आघाडी घेतली असून भाजप आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टी प्रत्येकी एका जागेवर आघाडीवर आहे.

**मध्य प्रदेशात** २९ मतदारसंघांपैकी सर्व २९ मतदारसंघात भाजपनं आघाडी घेतली आहे.

**मणिपूरमध्ये** दोन्ही मतदारसंघांत काँग्रेसनं आघाडी घेतली आहे.

**मेघालयात** २ मतदारसंघांपैकी पीपल्स पार्टी आणि काँग्रेसनं प्रत्येकी एका जागेवर आघाडी घेतली आहे.

**मिझोराममध्ये** असलेल्या एकाच जागेवर झोराम पीपल्स मुव्हमेंट आघाडीवर आहे.

**नागालँडमध्ये** असलेल्या एकाच जागेवर काँग्रेस पक्ष आघाडीवर आहे.

**ओदिशात** २१ मतदारसंघांपैकी भाजपनं __१९_ जागांवर आघाडी घेतली असून बिजू जनता दल आणि काँग्रेस प्रत्येकी एका जागी आघाडीवर आहे.

**पंजाबमध्ये** १३ मतदारसंघांपैकी काँग्रेसनं _६_ जागांवर आघाडी घेतली असून आम आदमी पार्टी _३_जागांवर आघाडीवर आहे.

**राजस्थानात** २५ मतदारसंघांपैकी भाजपन _१४_जागांवर तर काँग्रेस _८_ जागांवर आघाडीवर असून मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टी, राष्ट्रीय लोकतांत्रिक पार्टी आणि भारतीय आदिवासी पार्टी प्रत्येकी एका जागी आघाडीवर आहे.

**सिक्कीममध्ये असलेल्या** एकाच मतदारसंघात सिक्कीम क्रांतिकारी मोर्चा आघाडीवर आहे.

**तामिळनाडूत** ३९ मतदारसंघात द्रमुक _२१_ ठिकाणी आघाडीवर आहे. काँग्रेस _९_ ठिकाणी आघाडीवर आहे.

**त्रिपुरात** दोन्ही जागांवर भाजपचे उमेदवार आघाडीवर आहेत.

**तेलंगणात** भाजप आणि काँग्रेस प्रत्येकी _८_जागांवर आघाडीवर आहेत.

**उत्तर प्रदेशात** ८० मतदारसंघांपैकी समाजवादी पार्टी _ ३५_ जागांवर तर भाजपनं __३४_ जागांवर आघाडी घेतली असून काँग्रेस _७_आणि राष्ट्रवादी लोकदल २ जागांवर आघाडीवर आहे.

**उत्तराखंडमधे** एकूण ५ जागांपैकी भाजपनं सर्व पाचही जागांवर आघाडी घेतली आहे.

**पश्चिम बंगालमध्ये ४२** मतदारसंघांपैकी तृणमूल काँग्रेस _३०_ जागांवर तर भाजपनं _११_ जागांवर आघाडी घेतली आहे.

**अंदमान निकोबारमध्ये** असलेल्या एकाच जागेवर भाजपनं आघाडी घेतली आहे

**जम्मू काश्मीरमध्ये** नॅशनल कॉन्फरन्स आणि भाजप प्रत्येकी २ जागांवर तर एका जागेवर अपक्ष आघाडीवर आहेत.

**चंदीगडमधल्या** असलेल्या एकाच जागेवर काँग्रेसनं आघाडी घेतली आहे.

**दादरा नगरहवेलीत** भाजप आणि अपक्ष प्रत्येकी एका जागेवर आघाडीवर आहेत.

**दिल्लीत** सर्व सातही जागांवर भाजप उमेदवारांनी आघाडी घेतली आहे.

**लडाखमध्ये** असलेल्या एकाच जागेवर अपक्ष आघाडीवर आहे

**लक्षद्वीपमध्ये** असलेल्या एकाच जागेवर काँग्रेसनं आघाडी घेतली आहे

**पुद्दुचेरीत** एकाच जागेवर काँग्रेसनं आघाडी घेतली आहे

**देशभरातल्या** ४ ठिकाणचे निकाल जाहीर झाले असून त्यातल्या ३ जागांवर भाजपाचे तर एका मतदारसंघात काँग्रेसचा उमेदवार विजयी झाला आहे.

<><><><><>

उत्तर प्रदेशात वाराणसी मतदारसंघात भाजप नेते आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी तर मथुरा मतदारसंघात भाजपच्याच हेमामालिनी आघाडीवर आहेत. राहुल गांधी उत्तर प्रदेशात रायबरेली आणि केरळात वायनाड मतदारसंघातून निवडणूक लढवत असून दोन्ही ठिकाणी ते आघाडीवर आहेत. अमेठी मतदारसंघात स्मृती इराणी पिछाडीवर आहेत. हिमाचल प्रदेशात भाजपच्या कंगना राणावत आघाडीवर आहेत. रत्नागिरी-सिंधुदुर्ग मतदारसंघात नारायण राणे आघाडीवर आहेत. गुजरातच्या गांधीनगर मतदारसंघात केंद्रीय मंत्री अमित शाह आघाडीवर आहेत. हिमाचल प्रदेशात हमीरपूर मतदारसंघात अनुराग सिंह ठाकूर यांनी मोठी आघाडी घेतली आहे.

<><><><><>

मुंबई शेअर बाजारात आज मोठी पडझड नोंदवण्यात आली. मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स आणि निफ्टीत पाच टक्क्यांहून अधिक घट झाली.

आज सकाळी बाजाराच्या कामकाजाला सुरुवात झाली तेव्हाच बाजारात घसरणीला सुरुवात झाली.

पहिल्या सत्रात सेन्सेक्स १ हजार ७०० अंकांनी तर निफ्टी ५०० अंकांनी कोसळला. ही पडझड दुसऱ्या सत्रातही कायम राहिली. सेन्सेक्समध्ये सुमारे सहा हजारांची घट झाली आणि तो ७१ हजारांवर आला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी ही सुमारे दोन हजारांनी कोसळला. ताज्या माहितीनुसार सेन्सेक्समध्ये ४ हजार २६३ अंकांची घट झाली असून निर्देशांक ७२ हजार २०३ अंकांवर आहे.

तर निफ्टीतही १ हजार ३३५ अंकांची घसरण झाली असून तो २१ हजार ९२९ अंकांवर आहे.

शेअर बाजारात झालेल्या या पडझडीमुळे गुंतवणूकदारांचं सुमारे १० लाख ३२ कोटी रुपयांचं नुकसान झाल्याचा अंदाज आहे. कोरोनानंतर भारतीय शेअर बाजारात झालेली ही सर्वात मोठी पडझड आहे.

**<><><><>**

आंध्र प्रदेश आणि ओदिशा विधानसभेच्या निवडणुकीची मतमोजणी आज सुरू आहे.

आंध्र प्रदेशातल्या **१७५** जागांपैकी **१३१** जागांवर तेलुगु देसम, **१८** जागांवर वायएसआर काँग्रेस, **१९**  जागांवर जनसेना पक्ष तर **७** जागांवर भाजपाचे उमेदवार आघाडीवर आहेत.

ओदिशाच्या विधानसभेच्या **१४७** जागांपैकी **७२** जागांवर भाजपा, **५७** जागांवर बिजु जनता दल तर काँग्रेस **१५** जागांवर आघाडीवर आहे.

**<><><><>**

सिंगापूर खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत दिग्गज भारतीय खेळाडू आज इंडोनेशियाची राजधानी जकार्ता इथं आपापले सामने खेळणार आहेत. लक्ष्य सेन, एच.एस. प्रणॉय, किदाम्बी श्रीकांत, प्रियांशू राजावत आणि किरण जॉर्ज यासारखे अव्वल भारतीय खेळाडू पुरुष एकेरीत उतरतील.